प्रथम-मान्यता/दर्जावाढ

अहमदनगर जिल्हा परिषद
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.कार्या-४/स्वयंअर्थ/७६६४/१९
अहमदनगर दि.१८/१०/२०१९

प्रति,

अध्यक्ष/सचिव
श्री.कालिका फौंडेशन,जामखेड,
ता.जामखेड, जि. अहमदनगर

विषय :- सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे तसेच विदयमान शाळेचा दर्जावाढ करणे करीता परवानगी देऊन प्रथम मान्यता देणेबाबत

संदर्भः- १) शासन निर्णय एमएफएस-१०१८/प्र.क्र.१५३५/एसएम-२ दि.२२.०१.२०१९
२) मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचेकडील पत्र जा.क्र.शिउसं/प्राथ-२०२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१८-१९/५७४० दि.०९/०८/२०१९
३) मा.शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांचेकडील पत्र क्र.खाप्राशा/स्वयंअर्थ/२०१३/ड-५१३/६३६६ दिनांक-३० नोव्हें.२०१३
४) गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती,जामखेड यांचेकडील तपासणी अहवाल दिनांक २३/०८/२०१९
५) महाराष्ट्र शासन राजपत्र ११ ऑक्टोंबर २०११ मधील ४ कलम ६ (क)
६) महाराष्ट्र शासन राजपत्र ४ जानेवारी २०१३ मधील अनुसूची क (१३)
७) महाराष्ट्र शासन राजपत्र २ जुलै २०१३ मधील अनुसूची ग (४)

वरील विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनियमन अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्षे २०१८-१९ मध्ये नवीन शाळा स्थापन करणे करीता /विदयमान शाळेचा दर्जावाढ करणेकरीता प्रस्ताव सादर केला होता त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र-१ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरीता/विदयमान शाळेचा दर्जावाढ करणेकरीता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे-

त्याअनुषंगाने मा- शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांनी संदर्भ क्र.२ अन्वये नवीन शाळा स्थापन करणे/विदयमान शाळेचा दर्जावाढ करणेकरीता परवानगी देण्यात आली आहे.संदर्भ क्र.३ अन्वये मा.शिक्षण संचालक प्राथमिक म.रा.पुणे -१ यांनी प्रथम मान्यता देणेबाबतची कार्यवाही करणेबाबत सुचित केले आहे.संस्थेने खालील अटी शर्तीची पुर्तता करणेचे अटीवर सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

शासन यादी अ.क्र	जिल्हा	अर्जदार संस्थेचे नाव	मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता	माध्यम	शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ	मान्यता वर्ग / इयत्ता	मान्यता वर्ष
१	२	३	४	५	६	७	८
१	अहमदनगर	श्री.कालिका फौंडेशन,जामखेड, ता.जामखेड, जि. अहमदनगर	कालिका पोदार लर्न स्कुल,जामखेड, ता.जामखेड, जि.अहमदनगर	इंग्रजी	नवीन शाळा	प्राथमिक ते उच्च प्राथमिक (इयत्ता १ ली ते ८ वी)	२०१८-१९

अटी व शती :

१) संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यात बदल करता येणार नाही.
२) शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३) या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासुन असेल.

Principal
Kalika Podar Learn School
Jamkhed, Ahilyanagar 413201
CBSE Affiliation No.1131239

Manager
Kalika Podar Learn School
Jamkhed,Ahilyanagar 413201.
CBSE Affiliation No.1131239

४) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालु करता येणार नाहीत

५) परवानगी मिळालेपासुन १८ महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी आपोआप रद्द बातल ठरेल.

६) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनियमन मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

७) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/ वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

८) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनियमन अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनियमन अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणुन स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

१०) शासनाचे सध्या अस्थित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक राहील.

११) पुर्व प्राथमिक शाळांना स्वतंत्र शाळा म्हणुन मंजुरी देण्यात आलेली नसुन इ. १ ली ते ८ वी पर्यत नवीन शाळा (राज्यमंडळ)परवानगी देण्यात आली आहे. महाराष्ट्र बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ च्या पोटनियम (४) नुसार ११ मानके पुर्ण करणे आवश्यक आहे.

१२) शासन निर्णय दिनांक १३ डिसें २०१३ व २८/८/२०१५ नुसार संच निश्चिती करुन घेणे आवश्यक आहे.

१३) प्रचलित नियम व निकषानुसार शिक्षक नियुक्ती करावी / टीईटी पात्र शिक्षकांची नियुक्तीसाठी योग्य ती कार्यवाही करावी.

१४) संस्था व्यवस्थापन व शिक्षणाधिकारी प्राथ जि.प. अहमदनगर संयुक्त नावे राष्ट्रीयकृत बँकेत तीन वर्षे कालावधीसाठी मुदतठेव ठेवणे आवश्यक आहे.

(रमाकांत काठमोरे)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रत- माहिती व कार्यवाहीसाठी

१)मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१
२)मा.शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनाय महाराष्ट्र राज्य पुणे-१
३)मा.शिक्षण संचालक प्राथमिक शिक्षण संचालनाय महाराष्ट्र राज्य पुणे-१
४)गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जामखेड

Principal
Kalika Podar Learn School
Jamkhed, Ahilyanagar 41320
CBSE Affiliation No.1131239

Manager
Kalika Podar Learn School
Jamkhed,Ahilyanagar 413201.
CBSE Affiliation No.1131239